# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१७ सप्टेंबर,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# चंद्रपुर एसडीपीओ स्कॉडची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## तिन आरोपीसह १५ लक्ष १६ हजाराचा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०९/२०१९ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे विशेष पथक चंद्रपुर शहर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, गजानन मंदीराजवळ एका इसमाच्या घरी अवैध रित्या दारूचा साठा जमा आहे. आणि त्याच ठिकाणी काही इसम एका चारचाकी वाहनातुन दारूचा माल उतरवित आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने छापा टाकुन तिन इसमास त्याब्यात घेतले. त्यांना विचारपुस करून वाहनाची आणि घराची झडती घेतली असता, वाहनात देशी विदेशी दारूचा माल मिळुन आला. यावरून आरोपी नामे १) मयुर राजेश लहरिया वय २४ रा. महाकाली वार्ड चंद्रपुर, २) राकेश शंकर चित्तुरवार वय ४० रा. बापटनगर चंद्रपुर ३) दिपक शंकरलाल जयस्वाल वय ५७ वर्ष रा. बापटनगर चंद्रपुर, यांना अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपीतांकडुन ३५ बॉक्स देशी दारूचा माल किं. ३,५०,०००/—रू, ११ बॉक्स विदेशी दारू मॅकडोवेल कंपनी किं. १,५६,६००/—रू आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेली होंडा ॲकार्ड वाहन क्र. एमएच ३१ सीएम ६०३० किं. १०,००,०००/—रू आणि दोन मोबाईल फोन किं. १०,०००/—रू, असा एकुण १५,१६,६००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री.शिलवंत नांदेळकर यांचे नेतृत्वात पोउपनि. श्री. जिवनदास लाकडे, यांचेसह पोना. संजय चौधरी, ज्ञानेश्वर तळेकर, पोशि. सुमित बरडे, विशाल वैरागडे, परमेश्वर सरकते यांनी पार पाडली.

———————————————————————————————————